1134

1134
BHENḌIGERĪ (Śaṅkar Rāmappā) & KEŚAKĀMAT (Gopāḷ Bhagavant), *comp.*
Janatā janārdanācyā āgrahāstava gumphilelī saṅgīta kānaḍī va marāṭhī rāṣṭrīya padya-mālā.
Śahāpura (Belgaum dist.) (Belgaum printed): Ś.R. Bhenḍigerī, G.B. Keśakāmata, [1931?].
31, 8 p.; 16 cm.
Nationalistic songs, mostly in Marathi with a few in Kannada.
PP Mar B 10; PIB 72/15

NATIONAL ARCHIVE

P|B 72 | 15

BHENDIGEERI (Śankar Ramappa)

Comp.

१ ले वंदेमातरम्.

राग वंगय (कॉफी) ताल दीपचंदी.

वंदे मातरम् ॥

सुजलां सुफलां मलयजशीतलाम् ।

शस्यशामलां । मातरम् ॥ ध्रु० ॥

शुभ्रज्योत्स्ना पुलकित यामिनीम् ।

फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम् ।

सुहासिनीं । सुमधुर भाषिणीम् ।

सुखदां । वरदां । मातरम् ॥ १ ॥

कोटि-कोटि कंठ-कल-कल निनाद कराले ।

कोटि-कोटि भुजैर्धृत खरकरवाले ॥

के बले मां तुमि अबले ।

बहुबल धारिणीं । नमामि तारिणीम् ।

रिपुबल वारिणीम् । मातरम् ॥ २ ॥

तुमि विद्या तुमि धर्म्म । तुमि हृदि तुमि मर्म्म ।

त्वं हि प्राणाः । शरीरे ॥

बाहु ते तुमि मा शक्ति । हृदये तुमि मा भक्ति ।

तोमारि प्रतिमा गटि मंदिरे मंदिरे ॥ ३ ॥

त्वं हि दुर्गा दश प्रहरण धारिणी ।

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कमला कमल दल विहारिणी ।
वाणी विद्या दायिनी । नमामि त्वाम् ।
नमामि कमलां अमलां अतुलाम् ।
सुजलां सुफलां मातरम् ॥ ४ ॥
श्यामलां सुरलां । सुस्मितां भूषिताम् ।
धरणीं भरणीं । मातरम् ॥ वंदे०

२ रे गणेश स्तवन (चाल-पाडवा सम्राट्पदाला)

श्रीगणेशा हे सुखेशा विघ्ननाशा ईश्वरा ॥
नमन तुंतें शांत चित्तें देईं आम्हां आसरा ॥ ध्रु० ॥
सौख्यकारी दुःखहारि वंद्य गौरीनंदना
हे त्रिनयना सौख्यसदना देईं कवना कल्पना ॥ १ ॥
अरिविनाशा हे कृपेशा मंगलेशा मोरया ॥
देवराया याचि ठायां सुयश कार्या देईं या ॥ २ ॥
विनंति तुजला हे दयाळा सकलविद्यासागरा ॥
भारता या उद्धराया देईं धी या पामरा ॥ ३ ॥
दीननाथा विश्वनना ऋद्धिसिद्धीनायका ॥
वांच वरितां पाव पतितां नमित आतां गजमुखा ॥ ४ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पद ३ (चाल-राधेकृष्ण बोल मुखसे.)

ऊठ हिंद्वीर युवका, सुप्रभातीं बोल। वंदेमातरम् अमोल।
युवका मंत्र हाचि बोला ॥ धृ ॥
गांधिवीर थोर महात्मा। भरतभूमिचा जो आत्मा।
बोधितो तुह्मांसि आतां।
मंत्रहाचि बोल वंदेमातरम् अमोल ॥ १ ॥
गृह गृहांत फिरवि चरखा। बसवि आंग्लहृदयीं चरका।
हाकलोनि पार परका।
मंत्रहाचि बोल वंदेमातरम् अमोल ॥ २ ॥
वापरोनी वस्त्र विदेशी। कां विटाळतां देहासी। शुद्ध
खादि ध्या स्वदेशि।
मंत्र हाचि बोल। वंदेमातरम् अमोल ॥ ३ ॥

पद ४ वें (चाल-परवशता पाश दैवें)

काशि येई झोंप आतां शय्या
रुचते जना ॥ कैसी ॥ धृ० ॥
एक वेळ न मिळे खाया ॥ देशबांधवांना ॥ काशि० १
सुप्रभाति फेरी फिरतां ॥ झोंप मोडते ना ॥ काशि० २
राष्ट्र-लढा जे जे लढती ॥ बंदिवास त्यांना ॥ काशि० ३
राष्ट्र-यज्ञ करितां देती ॥ हिंद वीर प्राणा ॥ काशि० ४
धन्य माउली ज्या व्याल्या ॥ शूर सुपुत्रांना ॥ काशि० ५

पद ५ वें (चाल—हे व्युराक्रशी सरकार---)

तुह्मि स्वस्थ किती निजणार । कधीं उठणार । राष्ट्रास लागली आग बंधुनो । झोंप कधीं सरणार ॥ धृ० ॥ भडकली आग राष्ट्रांत । तरि तुह्मी निजला स्वस्थ । नाहीं कां ? चित्ता खंत । ती आग विझविण्या शांति अहिंसा युद्ध कधीं लढणार ॥ १ ॥ ती दडपशाहिची ज्वाला । धग धगे हिंद देशाला । का तुह्मां न चरका वसला ! झणिं उठा सत्वरी सावध व्हा ना व्यर्थचि का मरणार॥२॥

पद ६ वें (चाल—सब से राम भजन)

जन हो उठा अशा या कालीं,
सुखमय निद्रा कशि आली ॥
अभिनव शय्या कां रुचली ॥ धृ० ॥
आर्त जनाच्या दुःखें द्रवतो,
या अपराधा पायीं ॥
वंद्य महात्मा येरवड्याच्या
पडला राजमहालीं ॥१॥ सुख० ॥
राष्ट्राचें बहुमोल जवाहिर,
वल्लभ आदि करोनी ॥
असंख्य हीरक बंदी पडले,
अशा कष्टमय कालीं ॥२॥ सुख० ॥

खरोजिनी कमलादि देवता,
राष्ट्राच्या अधिमाता ॥
सज्ज होति परदास्य सोचना
दशा तीच त्यां आली ॥३॥ सुख० ॥
कर-भारानें मीठ तोडिलें,
जनता निर्बल झाली ॥
शेती विठ्ठल-याच करानें
ठेवी हात कपाळीं ॥४॥ सुख० ॥
" व्यसनें सोडा " शब्द ऐकतां,
वदता पातक होतें ॥
दीन गाय सत्याग्रही जनता,
पचे लाठिच्या खालीं ॥५॥ सुख० ॥
गांधी टोपी पित्त चढवितें,
टकली विकितां शिक्षा ॥
कल्याणाचीं वा नाशाचीं,
कळे न बुद्धी सुचली ॥६॥ सुख० ॥
भूत-दयेनें एका काळीं
बला घरीं आदरिली ॥
चाखुनि मलिदा व्यापाराचा,
गेलेलठ्ठ जी केली ॥७॥ सुख० ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

परस्परांचे वैर घालुनी,
फोडा झोडा न्याय ॥
यजमानाच्या शिरी बैसुनी,
मिरी वाटण्या सजली ॥८॥ सुख० ॥
श्वासोच्छ्वासींपरसत्तेची,
आच येउनि भिडली ॥
नसे याचि जाणी आह्मां तरि,
व्यर्थ माय कां व्याली ॥९॥ सुख०॥

पद ७ वें (ताल-मेरे मौला बुलालो)

देवा यावि आतां ! सत्वशक्ति आह्मां ॥ देवा ॥ धृ ॥
गांधिनाम घेऊनिया । फिरि फिरे सर्वदा ॥
जागं व्हावे आतां । निद्रा घेता काशि ॥ १ ॥ देवा ॥
सौख्य सुखा त्याग करा । राष्ट्रहिता आचरा ॥
सुखासोडा आतां । दुःख आले घरा ॥ २ ॥ देवा ॥
मानपान सोडुनिया । मोहमाया सर्वथा ॥
स्वार्थत्याग करा । आतां आलि वेळा ॥ ३ ॥ देवा
स्वातंत्र्याचा लाभ व्हाया । गांधि ईश जन्मला ॥
सत्य युगिं राम । कलियुगि गांधि ॥ ४ ॥ देवा ॥

पद ९ वें (चाल-चरखा चला चलाके)

वनिया ह्मणोनि आला । धंदा करावयाला ॥ धृ ॥
व्यापार वाढवून । लालूच दाखवून ॥ त्यानें तुह्मां
अह्माला । नेलें रसातळाला ॥ १ ॥
सशस्त्र दरवडेखोर । निःशस्त्र लोकांवर । अवचित घालि
घाला । छळि व्यर्थचि प्रजेला ॥ २ ॥
जुलुमासि नाहि गणती । नाहींच न्याय नीती ॥ ह्मणतां
दयालु ज्याला । नाहीं दया तयाला ॥ ३ ॥
हा हिंद देश अपुला । ब्रिटिशांनीं फस्त केला ।
तरी उठा का निजला । जय महात्मा गांधी बोला ।

पद १० वें

चरखा चला चला के । लेंगे स्वराज्य लेंगे ॥
मलमल जो है विदेशी । आणे को गज मिलेगा ॥
खादी नही त्यजोंगे । लेंगे स्वराज्य लेंगे ॥
बहात्तर करोड रुपया । परदेशी जहा रहा है ॥
उसकू बचा बचा के । लेंगे स्वराज्य लेंगे ॥
चरखाकि घणघणाट । रणभेरि या बजेंगे ॥
आंग्रेज को सुनाके । लेंगे स्वराज्य लेंगे ।
या हक्क है हमारा । तनजानसेबि प्यारा ॥

मरणें नहीं डरेंगे । लेंगे स्वराज्य लेंगे ॥
हम सब परेड फौजी । कप्तान हमारा गांधि ॥
आज्ञा उसीकि लेंगे । लेंगे स्वराज्य लेंगे ॥
तेहतीस करोड फौजी ! रण साथ ए चलेंगे ॥
गांधी हुकूम करेंगे ! लेंगे स्वराज्य लेंगे
चरखा ही तोफ बनेंगे ! तकवा बने है बरची ॥
गोलेसे सबके हम ! लेंगे स्वराज्य लेंगे ॥

झेंडा वंदन [पद ११ वें.]

नव हिंद राष्ट्र झेंड्या, प्रणामा घेया -ध्रु०-
हिंदभूमिच्या हिंदिजनांच्या,स्वाभिमान चिन्हा प्रणामा.-१-
स्वातंत्र्याच्या वाऱ्यावरती, वा फडफडणाऱ्या प्रणामा. -२-
स्वराज्य माझें मीहि त्याचा, जगता सांगाया प्रणामा -३-
हिंदपुत्र हे सिद्ध तुझ्यास्तव प्राणहि अर्पाया प्रणामा -४-
नव्या मनूच शिलेदार हे, नमिती तुजराया प्रणामा -५

पद १२ वें (चाल का अबोल नाथ बोला)

बोल सख्या बन्सिवाला पाहुं कोठें गांधिजीला । ध्रु० ॥
सत्यदावें तो जगाला । हिंद भूचा दास झाला । १ ॥
ताप सोशी देशकार्या । द्रव्य वेंची राष्ट्रकार्या ॥
मार्ग दाविला आम्हांला । पारतंत्री घाव पडला ॥ २ ॥
धर्म युद्धि टाकला । तुरंगी त्याला धाडिलें ॥
हाय कैसी घात झाला । शोधुं कोठें गांधिजीला । ४ ॥

पद १३ वें (चाल—मेरे मौला बुलावे)

सखया मोहनदास, हिंद लोक विराम ॥ धृ ॥
सत्य नीति भूत दया पाठ जना द्यावया ॥
धर्म—कर्म साधनि निष्काम निरति यावया ॥
होशी तारक राम ॥ हिंद ॥ १ ॥
बुद्ध ख्रिस्त जैनहि इस्लाम धर्म--माधुरी ॥
मूर्तिमंत मीटचि तूं सर्व धर्म सागरीं ॥
स्वामी संत निदान ॥ हिंद ॥ २ ॥
'हिंद जाति एक तसा राष्ट्र धर्म एक वा ॥
मातृभूमी एक जरी राष्ट्र बंधु एक व्हा' ॥
देशी मंत्र ललाम ॥ हिंद ॥ ३ ॥

पद १४ वें (चाल—भैयो मैया--)

महात्मा गांधीजी.

ईशमूर्ती महात्मा गांधीजी ॥ ध्रु ॥ असंख्याशी वर्षे पारतंत्र्य पचांत ॥ करी असह्य अशा सह्य वेदना स्वस्थ ॥ तया अनाथ अशा भारता विमुक्तार्थ ॥ अटके मध्यें गेले सुरतेमाजी ॥१॥ जगीं समर्थ असे रक्षिण्यासि हिंदुत्व । समर्थ दास जणूं त्या समान सद्भाव । स्वदेश पाहुनि हा येउनि बहु कींव । खादीवाले । झाले । राष्ट्रांमाजी ॥२॥ मदीय बांधवहो या तुली स्वदेशाचे

असाल हो अभिमानी खरे तरी साचे । उठा त्वेसचि वना दास खास खादीचे । वंदा वंदा भावें त्यांत आंधी ॥३॥

—विश्ववंद्य गांधी राजा.—

पद १५ वें (चाल–ठरला जणुं मत्सर राजा—)

प्रमुसम प्रिय महात्मा गांधी,हक्क रक्षितां झाला वंदी॥धृ. स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठीं, कारागृहीं क्लेश सोशिती. ॥ वृद्ध देह देशा झिजवीती, लाज कशी नच भारत चित्तीं ॥१॥ स्वातंत्र्यांची झळके मूर्ति । चरखा चक्र-सुदर्शन हातीं, परवशतेचा पाश तोडिती, अखिल जगीं या फडके कीर्ती ॥२॥

पद १६ वें (चाल–आनंद कंद)

साधी रहाणि बरवी, खादीच वापरावी ॥
परकीय वेश पेशा ॥
स्वीकारूनी स्वदेशा ॥
न्यूनत्व येत विमर्शी । खादीच वापरावी ॥१॥
शिरिं भार तो करांचा ॥
अति घोर तो मिठाचा ॥
दैन्यांत हिंद बुडवी, खादीच वापरावी ॥२॥
टकळीच अग्नि अस्त्र ॥

जाळील आंग्ल वस्त्र ॥
ही म्हूण बाळगावी, खादीच वापरावी ॥३॥
चरका धरोनी स्वकरें ॥
फिरवा सदैव निकरें ॥
स्वातंत्र्य मार्ग दावी, खादीच वापरावी ॥४॥
निर्वाह स्वावलंबी ॥
परतंत्रतेस तंबी ॥
व्यसनीं मती-चिटावी, खादीच वापरावी ॥५॥
खादींत चित्त शुद्धी ॥
खादींत शांति वृद्धी ॥
निर्वाण हिंदजीवीं, खादीच वापरावी ॥६॥

उठा—— !

पद १७ वें [चाल--चुराके चले-]

उठा बंधुनो उठा जागे व्हणी व्हा ॥ध्रृ.॥ कशि ही काळ झोंप भारतीय हो अजुनी । कळे न काय तुम्हां दास्य-पंकि भूजननीं । रक्षण्यासी चला, या, सत्याग्रहा ॥१॥ करा विमुक्त प्रभू गांधी महात्माजी । स्वराज्य मंदिरिं ते आजि यरवड्यामाजीं । चक्रपाणी प्रभूनी बैसले पहा ॥२॥ उठा

पद १८ वें (हिंदभूला-वंदन)

मन्माय भरतभूमी वंदितों मी ॥ धृ ॥ साम्राज्य-पदार्थी जननी ॥ समृद्ध विभव धनधानी ॥ औदार्य शौर्य अभिमानी ॥ होती जी एकेकालि । तीच या कालि । तीच या कालि । होय अनुगामी ॥ मन्माय० ॥ १ ॥

सह्याद्रि हिमालय यानें । नदनद्या सिंधु यमुनेनें । कास्मीर स्वर्ग भूमीनें । भूषीत असे जी झालि । तीच या कालि । होय अनुगामी । होय अनुगामी ॥ मन्माय. ॥२॥

श्रीराम धर्मरायानें । प्रतिपाळिली वात्सल्यानें । पृथुराज शिवरायानें । तारिले जिला अवकालि । तीच या कालि। होय अनुगामी ॥ मन्मा०॥३॥

लाठीवाला !

पद १९ वें (चाल—टोपीवाला पाहुणा....)

टोपीवाला, अजि बनला लाठीवाला -धृ०-

अस्सल वनिया विलायतेचा,
कवडी दमडी करावयाचा,
धनि झाला हिंदुस्थानाचा,
तागडीवाला, अजि बनला लाठीवाला -१-
फोडुनी झोडा तन्या वरिलें,
इंग्रजि राज्या स्थापित केलें ,

नवे कायदे चालू केले,
अंमल बसला, आज बनला लाठीवाला -२-
कांचा देऊनि माणिक नेलें,
इंग्रज सगळे गब्बर केलें
हिंदी जन कासाविस झाले ,
जीव भुकेला, अजि बनला लाठीवाला -३-
उडुनि गेली आतां माया,
कळुनि आली इंग्रज किमया,
स्वातंत्र्याचें ध्येय वराया,
जन हा सजला, अजि बनला लाठीवाला -४-
गांधीजींनीं मंत्र कथियला,
सत्य अहिंसा धर्म उदेला,
भीति टाकुनि जन हा सजला,
संग्रामाला, अजि बनला लाठीवाला -५-
पाहुनी जनता जागृत झाली,
बोबडी बनियाची ही वळली,
म्हणे कायहो करूं या वेळीं,
कोणी बोला, अजि बनला लाठीवाला -६-
संतापानें चिडून गेला,
निःशस्त्राना हाणित सुटला,
स्त्रियामुलांचा भेद न उरला,

वंदें बोला, अजि बनला लाठीवाला -७-

बंधुभगिनींनो, ब्रीदा पाळा,

मंगल सत्याचा जय बोला,

अनंतछंदी कवि गुंहिवरला,

प्रेमें धाला, अजि बनला लाठीवाला -८-

महात्माजींचा मंत्र.

पद २० वें (चाल--पांडवा सम्राट पदाला-)

हिंद जनहो नित्य बोला मंत्र वंदेमातरम् ॥

शुद्ध सुंदर अति मनोहर मंत्र वंदेमातरम् ॥ ध्रु० ॥

वीर सारे व्हा लढाया पूर्ण स्वातंत्र्या वरा ।

देह सजवायास आतां शुद्ध खादी वापरा १

माल सोडा तो विदेशी दैन्य आले भारता ।

दारु सोडा सर्व नाशी व्यर्थ का हो प्राशिता २

वीर बहु गेले तुरंगी स्वस्थ कैसे बैसला ।

दुष्ट कानू सर्व मोडा मंत्र गांधींनी दिला ३

मिळवुनी स्वातंत्र्य सौख्या मातृभूमी उद्धरा ।

त्यागुनी सैतानि सत्ता ताप जगताचा हरा ४

पद २१ वें (चाल—सुखाचा शोध)

सुटेना मोह दारुचा,

करी जी नाश शरिराचा -ध्रु-

रुचेना अन्य पेयाते ,

जरी शोषांत रुधिरातें ॥
मिळेना अन्न वसनातें,
परी त्या ध्यास दारुचा -सुटे०-
न लेखी लोक निंदेते,
न देखी पापपुण्यातें ॥
अकाली आपुल्या हाते,
विनाशी देह मोलाचा -सुटे०-
क्षुधेनें गांजलीं बाळें,
स्वकांता त्रस्त आबाळे ॥
शठांचे पापमय चाळे,
न वारी मंद वृत्तींचा -सुटे०-

दुष्ट दारू.

चाल-साधी.

पिऊं नका पिऊं नका असली दारू पिऊं नका -ध्रु.-

ब्राह्मण दारूबाज.

घरांत बसली बाईल उघडी, कानावरती पगडी वाकडी,
हातांत सुंदर छडी फांकडी, तोंडांत सुंदर सिगारेट विडी
हातांत बारीक बाटली वेंडी, ब्राह्मण दारुबाज याला भजूं
नका पुजूं नका असली दारू पिऊं नका १

सर्कसवाला दारुबाज—

सर्कसवाला पिंजऱ्यामाग, त्यालाही दारुची आग, खेळा-
याला सोडला वाघ, पिस्तुल उडवी आला राग, पिंजरा
उडाला माणसांत वाघ, सर्कसवाला दारुबाज त्याची
सर्कस बघूं नका बघूं नका असली दारु पिऊं नका -२-

पाटील दारुबाज.

चावडींत बसला साऱ्यांहार, पंज पैरण छुई चक्कार,
मिशा पिळतो मरदार, घेडावरचा अमलदार, पिऊनी
वेडी झाला तर, ज्याला त्याला अरे तरे, पाटील दारुबाज
ह्याला नमूं नका नमूं नका असली दारु पिऊं नका -३-

पोलीस दारुबाज.

सरकारी पोषाक पेटदार, बिल्ला सोटा बंदूक बार, आल्या
गेल्यावर गुरगुर पैसा सारा दिडक्या चार, त्याच्या दुप्पट
घ्यो पिणार, पोलिस दारुबाज ह्याला भिऊं नका भिऊं
नका असली दारु पिऊं नका -४-

मोटार एजंट दारुबाज.

सगळ्या गाडींत बारा लिव्या, तिकिटे विकली चवदा
पंधरा, बोकड चिव्या सतरा आठरा, हिकडे तिकडे
घाली चकरा, दारू ढोसून करतो नखरा, एजंट दारुबाज
असला ठेवूं नका ठेवूं नका असली दारू पिऊं नका -५-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

क्लिनर दारूबाज—

तोंडावरती माती थोडी, पुसता पुसता एंजिन मोडी, बघतां बघतां करतोय खोडी, सिगारेट पेटवून टाकली काडी, पेट्रोल पेटून जळली गाडी, क्लिनर दारूबाज असला ठेवूं नका ठेवूं असली दारू पिऊं नका -६-

ड्रायव्हर दारूबाज—

खाकी पोषाक डुईवर हॅट मोडक इंग्लिश धिस नो दॅट मोटार चाक चारी ऑट, दारू ढोसून झाला लेट, झाडा-वरत नेतोय थेट, ड्रायव्हर दारूबाज असला ठेवूं नका ठेवूं नका असली गच्याळ दारू पिऊं नका -७-

गुत्तेवाला—

इंग्रज सरकारची सत्ता, चौकावरती झाला गुत्ता मक्ते-दाराची ही मत्ता, त्यालाही दारूचा भत्ता, पित्याचे हाल खाईना कुत्ता, विकणार दारूबाज त्याची घेऊं नका घेऊं नका असली दारू पिऊं नका -८-

ब्राह्मण शिंपी कोष्टी साळी वडर कैकाडी तांबोळी, म्हार मांग मराठा माळी, घिसाड आळी सगळे दारूबाज यांना ठेवूं नका ठेवूं नका असली दारू पिऊं नका -९-

पद २३ वें (चाल-सुखाचा शोध)

कायदेभंग करण्याला, चला व्हा तयार मरण्याला ॥
जुलुमी कायदे आतां, बंधूनों मोडण्याकरितां ॥

उठाहो स्वस्थ कां वसलां, चला तयार मरण्याला ॥
असें हें कृत्य करितांना, येइल ब्रिटिशांना ॥
त्रास देतील आपणाला, तरि व्हा तयार मरण्याला ॥
गोळीवार करतील, शेवटी सूळी देतील ॥
तरीही भिऊं नका त्याला, चला व्हा तयार मरण्याला॥
भ्याड हो उठा लवलाही, मनाची लाज धरा कांहीं ॥
असे कां आळसी वनलां, चला व्हा तयार मरण्याला ॥
विनवि कवि शंकर, वंधुहो बांधा कंवर ॥
आंग्लाई नष्ट करण्याला, चला व्हा तयार मरण्याला ॥

पद २४ वें [चाल-नवहिंद राष्ट्र झेंड्या]

स्वातंत्र्य गडावरीया--निशाणा चढवा ॥ध्रु॥
दडला कोठें शिवरायाचा । तो गनिमी कावा ॥
तानाजी म्हणे जीं जीं सगळे । सिंह एक व्हावा ॥
शठशाठ्य हा वलवंताचा । खुराक तो लावा ॥
तिरंगी झेंडा अटकेवरती । अटकेवरी लावा ॥१॥

(हिंदवीरानो जागे व्हा.)

पद २५ वें (चाल-शांतवा हो मानसा-)

उठ वीर ! रणि अतां । आग लागे सर्वथा । शत्रुनीं छळ मांडितां । स्वस्थ कैसे झोंपतां ॥ ध्रु० ॥ भरतभूमी गांजिता । हाक मारी भारता । हिंदसुत ना ? म्हणवितां ।

धर्मयुद्धा कां भिता? ॥१॥ अस्त्र घ्याहो शांतता। शत्रू संगे झुंजतां। येई आणि स्वातंत्र्यता। हिंदभूमी मुक्तता ॥२॥

पद २६ वें (चाल–हे व्युराक्रशी सरकार—)

तुह्मि स्वस्थ किती निजणार, कधीं उठणार, राष्ट्रास लागली आग बंधुनो, झोंप कधीं सरणार ॥ध्रु०॥ भडकली आग राष्ट्रांत, तरि तुह्मी निजला स्वस्थ, नाहीं कां? चित्ता खंत। ती आग विझविण्या शांति अहिंसा युद्ध कधीं लढणार ॥१॥ ती दडपशाहिची ज्वाला, घग धगे हिंद देशाला, कां तुह्मां न चरका बसला, आणि उठा सत्वरी सावध व्हा ना व्यर्थचि कां मरणार ॥२॥

पद २७ वें

गांधीजी बडे जादुगार ॥ ध्रु० ॥ एक फुंक मारीता दाविला थोर चमत्कार, जिकडे तिकडे खादी झाली, पहा घरोघर ॥१॥ म्यांचेस्टरची गिरणी राक्षसी शक्ति तिचि थोर, गांधी आले ऐसे एकता कांपे थरथर ॥२॥ मद्य राक्षसी दुजी मातली खाई मांस रुदिर, कांच बाटलीत थाट तियेचा मोहक गुलजार, २ नाहींच नीति तिला तिळभरी पाकि मांडखोर, फुंक मारिता तिला पाडिली

भूमिवर ठार,॥४॥ गुरु रामाच्या पुढें नाचले भुतांचे ताट,
गांधीआले ऐस एकता चहा पळे दूर, ॥ ५

पद २८ वें

देवा द्यावी आतां, संघ शक्ति आह्मां ॥धृ०॥
रामनाम घेऊनियां, फेरी नित्ये सर्वदा ॥
जागे व्हावें आतां, निद्रा आली कशी -१- देवा० ॥
सौख्य सुखा त्याग करा, राष्ट्रगीत आचरा ॥
सुखा सोडा आतां, दुःख आलें घरा -२- देवा ॥
मानपान सोडुनिया, मोहमाया सर्वथा ॥
स्वार्थत्याग करा आतां आली वेळा -३- देवा० ॥
स्वातंत्र्याचा लाभ घ्याया, गांधी ईश जन्मला ॥
सत्ययुगीं राम, कली युगी गांधी -४- देवा० ॥

पद २९ वें

महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले, मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले ॥ खरा वीर, वैरी पराधीनतेचा, महाराष्ट्र आधार या भारताचा ॥ कसाही छळो वैरि सत्याग्रहांत, कसाही छळो वैरि कारागृहांत ॥ आम्ही पांडवासारखी शिस्त पाळूं, मनींच्या मनीं अमुचा क्रोध जाळूं, तिहीं पांडवीं हाल वर्षानुवर्षां, कसे काढिलें जाणुनीयां अमर्ष ॥ तसे हाल काढूं आह्मीं काहीं काळ, कसाहि छळो वैरि सोडूनि ताळ ॥

पद ३० वें (चाल—राधे कृष्ण बोल)

पारतंत्र्य पाश तोडा ॥ व्हा स्वतंत्र ऐक्य जोडा ॥
ध्येय हें विशाल ॥धृ०॥
जरि लाठिपात शिरिं झाला ॥
प्रतिकार करा न च त्याला
नित सत्यनिष्ठ जरि बनला ॥
तरि विजयी निश्चित व्हाल ॥ जोडा ध्येय० १
मनिं त्रिविध जाति पथ पुरवा ॥
प्रभु राष्ट्रधर्म दृढ ठसवा ॥
ध्वज एक राष्ट्रिचा मिरवा ॥
करिं धरणें शांति--कराल ॥ जोडा ध्येय० २

पद ३१ वें (चाल मधुबासरी आनंदा)

फिरवूं चला चला या । चरखा सुदर्शनाला ॥
मिळवा स्वराज्य फिरवा । चरखा सुदर्शनाला ॥ ध्रु०॥
चरखा सुदर्शनाला । देवोनि हिंद बाला ॥
गांधि स्वराज्य वाला । बंदींत आज गेला ॥
कंसारि श्री हरीचा । बंदींत जन्म झाला ॥
बंदीस नाहिं भ्याला । गीता रहस्य वाला ॥
स्वातंत्र्य पंथ झाला । या आज बंदि शाला॥
स्वातंत्र्य शिक्षणाला । तरुणांस बंदिशाला॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

खादी अमोल अस्त्र । चरखा अमोघ शस्त्र ॥
म्याना मधून खोला । दचकेल टोपीवाला ॥
निःशस्त्र शांति सेना । चिरडील टोपीवाला ॥
पुरुषार्थ काय झाला । कोर पाप संग्रहाला ॥
असुरी भयाण लीला । होतात ज्या वेळाला ॥
अवतार त्याच काला । प्रभु राम घेत झाला ॥

पद ३२ वें. चालः—राधे कृष्ण बोल मुखसे

आण ध्या निशाण अवनीं, मातृभूमिच्या चरणीं
देह वाहुया ॥ धृ० ॥
महायुद्धि खर्ची पडले, हिंदवीर काय घडले ।
दास्य-पाश पायीं जडले, भारताचिया ॥ १ ॥
शस्त्र घ्या करांत चरखा. देई जो परास चरका ॥
आंग्ल राज्य सत्ता नरका, खास न्यावया ॥ २ ॥
गेहशून्य चरखा नसतां, देहशुद्धि खादि वारितां ।
ध्येय साध्य सत्याभिरतां, स्वार्थ त्यागिया ॥३॥
सिगारेट व्यसन विदेशीं, सुरापान व्यसनें तैशीं ।
सोडवा सुबत्ता देशीं, प्राप्त व्हावया ॥ ४ ॥
बालवीर ये धडाडीं, । हिंद माय हांक फोडी ।
वर्ष एक ए बी सी डी, जाऊदे लया ॥ ५ ॥
हिंद जात एक सारी, राष्ट्रधर्म एक विचारीं

भिन्न भाव सोटा समरी, या ल्ढावाया ॥६॥
सर्व देश जागृत झाला . शांति समर रंगा आला ।
होय तो कांटा चुकला, भाग घ्यावया ॥७॥

राष्ट्रसंतांना वंदन !

पद ३२ वें (चाल :—आनंद कंद—)

या वंदु राष्ट्रसंतां, त्या थोर भाग्यवंतां ॥धृ०॥
ते विश्ववंद्य गांधी, वंदूं तयांस आधीं ॥
हरतील राष्ट्रव्याधी, महिमा सदैव गातां १
ते नेहरू पिताश्री, लोळे पदीं स्वतां श्री ॥
गातां मुखें गुणश्री, येईल भाग्य हातां २
ज्याचा पिताचि मोती, त्या काय होय कमती ॥
अर्पूं जवाहिरा ती, प्रणती स्वभावयुक्ता ३
ते वल्लभी पटेल, महती जगा पटेल ॥
ज्याच्या हृदीं सखोल, दे शांतिला विधाता ४
मदनास लाजवोनी, मोहून टाकी अवनी ॥
त्या मालवीयजींनीं, वेडविलें अनंता ५
या संतपंचकाला, वंदा हि गा यशाला ॥
हे वंद्य विश्वपाला, हो पूर्ण सौख्य दाता ६

तो विश्व गांधी !

पद ३३ वें (चाल-श्री विश्ववंद्य गणराज.)

तो विश्ववंद्य गांधी, जाहला बंदी ॥ध्रु॥
शांतिबलानें भ्रांति घालवी, जग त्याला वंदी,
जाहला बंदी १
वेडा ह्मणतां वेडाचि लावी, गुंगे आनंदीं,
जाहला बंदी २
सत्याचि बोले सत्याचि चाले, सत्याचा छंदी,
जाहला बंदी ३
शत्रूलाहि मित्र लेखुनी, उतरविती धुंदी.
जाहला बंदी २
जगिं उपकारपुरता, कसला तो कैदी ॥
जाहला बंदी ५

स्वतंत्र भारताची प्रार्थना.

पद ३४ वें

हे प्रभो आनंद दाता । ज्ञान हमको दीजिये ॥
शीघ्र सारे दुर्गुणोंको । दूर हमसे कीजिये ॥
लीजिये हमको शरणमें । हम सदाचारी बने ॥
ब्रह्मचारी धर्मरक्षक । वीर्यव्रतधारी बने ॥१॥

पद ३४ वें.

समरास सज्ज झाला । सत्याग्रही निघाला ॥
मोहीम रोखुनीया । रणशूर घेऊनीया ॥
संग्राम झुंजण्याला । सत्याग्रही निघाला ॥ १ ॥
सामर्थ्य वर्धवोनी । जगतास चेतवोनी ॥
कामाशीं खेळण्याला । सत्याग्रही निघाला ॥ २ ॥
सत्या समान नाहीं ॥ जगीं वंद्य अन्य कांहीं ॥
पुरुषार्थ पेरण्याला । सत्याग्रही निघाला ॥ ३ ॥
श्रेष्ठांत श्रेष्ठ थोर । सेनानी क्रांतिसार ॥
स्वातंत्र्य घोषणाला । सत्याग्रही निघाला ॥ ४ ॥
अध्यात्म योग भारे । विश्वास जो भरारे ॥
स्वातंत्र्य सेवनाला । सत्याग्रही निघाला ॥५॥
योगींद्र तो महात्मा । जो हिंद देश आत्मा ॥
थरकांपवी जगाला । सत्याग्रही निघाला ॥६॥
यशवंत वीर माझा । विजयी करूनी काजा ॥
हा आश्रमांत यात्रा । सत्याग्रही निघाला ॥ ७ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पद ३५ वें (चाल:-मला मुंबईला जायचं०)

साकु साकण्णा । ई होरगिन धव लगु ओडिस बेकण्णा ॥ ध्रु० ॥ वीर नेहरू गांधी इंथिथावरन केंदी । कळिशी इड्ड माडुवदेनरि प्राणा ॥ १ ॥ वरुषा आरवत्त कोटी । रुपाय माडि लूटी । हाकि बिट्ट नमग लंगोटी ॥ २ ॥ दिन्ना जंत्रा तिरिवि । तेगेदु नूलिन अरिवि । धरिशि कायिरि भारत बडताना । साकु साकण्णा । ई परदेश अरिविगि लगु बेंकि हच्चण्णा ॥ ३ ॥ इप्पत्तैद कोटि । शिंदि शेरे बाटली । कुडद कुडद बंत बिक्कि सोट्टी ॥ ४ ॥ उद्योग धंदेग मंदि । बिद्द कैद गांधि । इन्नेर बिडिरे शेरे शिंदि । साकु साकण्णा, ई शेरे शिंदी म्याग उच्ची होग्यण्णा ॥ ५ ॥ बळिशि फाळे पट्टी । रयतन बिगद यट्टी । तिन्नाक सिगदांग अवरिगे रागिरोट्टी अल्ल अल्लण्णा ई इंग्रज सरकार रीति ओळदल्लण्णा । ॥ ६ ॥ तंद दोड्ड दोड्ड गिरणी । मुच्चिद मग्गद कुणी । नेयकार बडकोतार हणा हणी । हौद हौदण्णा इदनेल्ला नोडि बंत गांधिगे करुणा ॥ ७ ॥ एंणि दरुवतनका । दीप उरतैति ठीका । पूर्वपुण्य इरुवतनका बेळका । हौद हौदण्णा । ई इंग्रज सरकार पुण्य इंदिगे मुगितण्णा

॥ ८ ॥ पूरा रामायणा । वल्ल बहळ जना । रावण नंथा-
त्रर मुक्किदार मण्णा । साक साकण्णा ई इंम्रज सरकार्दे
इथावर मुंद पाडना ॥ ९ ॥ शांति क्विता हाकि । आगरि
एल्लारेक्कि । गांधि तत्वक इरवेक बहळ ज्वाकि । केळ
केळरण्णा इरूर म्याले यल्ला । तिळकोंड इन्न नडिरेण्णा
॥१०॥

पद ३६ वें (चाल-भैरवी ताल धुमाळी.)

भूमाते सेवगागी, विदेसी मोह त्यजिसिरी ॥ध्रु॥
तरिसुत सुंदर मोटार गाडी, फोर्ड साहेबरिगे सहाय
माडी, राष्ट्र-बंधुगळिगाहितवमाडी मेरियदेहरि ॥ १ ॥
अनुदिन गैय्युत चहापाना, वेळिसी लिप्टन साहेबरमाना
लिप्टन एन्नुत ध्याना, माडे वेडिरि ॥ २ ॥ मेल-
थर प्रायमस स्टो विदेशी, मेडइन् इंग्लडद् कोप बशी,
किटली चमच्या प्लेट परदेशी, तारिस बेडिरि ॥३॥ सॅटिन
सनफ्लक कोटिन अरिवि, शर्ट मलमली धोत्र जॉनपिली,
हाट बुटस स्टाकिंगस् इंम्रजर, थाट जरेयिरी ॥ ४ ॥
कॉलर नेकटाय हॅकर चीप, काणदन्ते निसी बोळिसी
साफ, तेली म्याले गेणुन्व कॉप, तिरूग बेडिरी ॥ ५ ॥
टर्किश टुवाल इंग्लिश सोप, माल तोगोळ्ळुवेल्ला इंग्लंड

छाप, कोपिसि भूमाते कोहाळ शाप, दीनरागिरी ॥ ६॥ शाप विमोचने माडलु गांधी, बहिष्कार व्रत अहर्हिद जवधी, फॅशन मोहव तारेयुत मुदादि, खादी धरिसिरि ॥ ७ ॥

सोन्याची संदी.

चाल—मला मुंबईला जायाचं

आली सोन्याची संधी हातन नग गड्या घालवूं -धृ.

हिंदूमुसलमान दोघा सांगतो छान आता तंट्याच खूळ नका भाजवूं ॥ ऐका भारतवासी तोड सांगतो खाशी आतां परदेशी वस्तु नको वापरूं ॥ गड्या कापडवाल्यां ऐक मानसा भल्या। आतां परदेशी कापड नका मागवूं। दिसतो शिंपी छोटा पण कसबी मोठा गड्या परदेशी कापड नको कातरूं । ऐका वाणी काका नको चरूं हेका चहा साकऱ्या मुळींच नको मागवूं । ऐका कायदे पंडीत तुम्हा सांगतो खंडीत अतां दावे तक्रारी नका वाढवूं । वेड्या दारूबाजा तुला सांगतो मजा आतां दारूत पैका नका घालवूं । तुम्ही रावबहादूर डबक्यांतले दरदूर आतां पोकळ पदव्या नको चाववूं । ऐक पोलि-

सदादा तुझी जुलमी गदा आपल्या भाईबंदावर नको चालवू । जुलमी नोकरशाही जग-द्रोह बाई आतां सत्तेचा तोरा नको चालवूं । विनती भारतवासी ऐका गोष्ट ही खाशी आतां कायद्याची भीती नका बाळगूं ।

पद ३८ वें [चाल:-हा नको संसार]

हें असे कसे सरकार, दिना छळणार -धृ०-
सत्तेच्या जोरावरती जनतेस दाखवी भीता,
जुलमी हा असे कारभार, दिना छळणार -१-
भल भलते लादुनी कर जनतेस करी बेजार,
अन्याय करी अनिवार, दिना छळणार -२-
व्यापार कराया आले, परी राजे आज ते झाले,
बडिजाव वाढला फार, दिना छळणार -३-
अघोर कृत्य करतात, अमानुष-पणें छळीतात,
जनतेची नसे दरकार, दिना छळणार -४-
सरकार नव्हे सैतान, चालिते सदा थैमान,
लुटुनीया नेलं घरदार, दिना छळणार -५-
तरी अशा दुष्ट सरकारा, देऊ नका बंधुनो थारा,
हीच विनंती वारंवार, करा निर्धार, दिना० -६-

पद ३९ वें [चाल: आनंदकंद ऐसा....]

अयी मातृभूमि ! तेरे चरणों में सिर नमाऊं,
मै भक्तिभेंट अपनी, तेरी शरण में लाऊं -ध्रु०-
माथे पे तू हो चन्दन छाती पे तू हो माला,
जिव्हा पे गीत तू हो, मै तेरा नाम गाऊं -१-
जिससे सपूत उपजे श्रीराम, कृष्ण जैसे,
उस तेरी धूलि को मै, निज सीस पे चढाऊं -२-
सेवामें तेरी सारे, भेदों को भूल जाऊं,
वह पुण्यणाम तेरा प्रतिदिन सुनूं सुनाऊं -३-
तेरे ही काम आऊं, तेराहि मंत्र गाऊं,
मन और देह, तुजपर बलिदान मैं चढाऊं -४-

पद ४० वें

विजयी विश्वती रंगा प्यारा, झंडा ऊंचा रहे हमारा॥ ध्रु.॥
सदा शक्ति बरसानेवाला, प्रेम सुदा सरसानेवाला ॥
विरोंको हरसाने वाला, मातृभूमीका तनमन सारा
झंडा उंचा रहे हमारा ॥१॥
स्वतंत्रताके भिषण रणमें, लखकर बडे जोस क्षणक्षणमे ।
कांपे शत्रु देखकर मनमें, मिट जावें भय संकट सारा
झंडा उंचा रहे हमारा ॥२॥

इस झंडेके निचे निर्भय, ले स्वराज्य यह अविचल निश्चय।
बोले भारत माता की जय, स्वतंत्रता हो ध्येह हमारा
झंडा उंचा रहे हमारा ॥३॥
आवो प्यारो विरो आवो, देश धर्मपर बलीबलि जावो
एक साथ सब मिलकर गावो, प्यारा भारत देश हमारा
झंडा उंचा रहे हमारा ॥४॥
इसकी शान न जाने पाये, चाहे जान भलेही जायें
विश्वविजय करके दिखलाये, तब होवे प्रण पूर्ण हमारा
झंडा उंचा रहे हमारा ॥५॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पद- ३९ वें [चाल: आनंदकंद ऐसा....]

अयी मातृभूमि ! तेरे चरणों में सिर नमाऊं,
मैं भक्तिभेंट अपनी, तेरी शरण में लाऊं -ध्रु०-
माथे पे तू हो चन्दन छाती पे तू हो माला,
जिह्वा पे गीत तू हो, मैं तेरा नाम गाऊं -१-
जिससे सुपूत उपजे श्रीराम, कृष्ण जैसे,
उस तेरी धूलि को मैं, निज सीस पे चढाऊं -२-
सेवामें तेरी सारे, भेदों को भूल जाऊं,
वह पुण्यनाम तेरा प्रतिदिन सुनूं सुनाऊं -३-
तेरे ही काम आऊं, तेराहि मंत्र गाऊं,
मन और देह तुझपर बलिदान मैं चढाऊं -४-

पद ४० वें

विजयी विश्वतीं रंगा प्यारा, झंडा ऊंचा रहे हमारा ॥ ध्रु.॥
सदा शक्ति बरसानेवाला, प्रेम सुधा सरसानेवाला ॥
वीरोंको हरसाने वाला, मातृभूमिका तनमन सारा
झंडा ऊंचा रहे हमारा ॥१॥
स्वतंत्रताके भिषण रणमे, लखकर बढे जोश क्षणक्षणमे ।
कांपे शत्रु देखकर मनमें, मिट जावे भय संकट सारा
झंडा ऊंचा रहे हमारा ॥२॥

इस झंडेके निचे निर्भय, ले स्वराज्य यह अविचल निश्चय।
बोले भारत माता की जय, स्वतंत्रता हो ध्येह हमारा
झंडा उंचा रहे हमारा ॥३॥
आवो प्यारो विरो आवो, देश धर्मपर बलीबलि जावो
एक साथ सब मिलकर गावो, प्यारा भारत देश हमारा
झंडा उंचा रहे हमारा ॥४॥
इसकी शान न जाने पाये, चाहे जान भलेही जाये
विश्वविजय करके दिखलाये, तब होवे प्रण पूर्ण हमारा
झंडा उंचा रहे हमारा ॥५॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

आमचेकडे रहाट, टकळ्या, स्प्रिंगच्या टकळ्या, सर्व तऱ्हेचे कापसाचे पेळू, शुद्ध खादी व पटके, देशी कांच सामान, देशी साबण, सर्व तऱ्हेच्या कानडी व मराठी पद्यावळ्या, हरतऱ्हेचे देशभक्तांचे व देवादिकांचे फोटो व लॉकेट्स वगैरे सर्व तऱ्हेच्या पूर्ण देशी माल ठोक व किरकोळ भावाने विकत मिळेल. तसेच फोटोस फ्रेमी घालून देऊं.

गोपाळ भगवंत केशकामत

जनरल मर्चंट

शहापूर—बेळगांव.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪದಗಳು.

ಧಾಟಿ:- ಮರಾಮುಂಜ್ಯೆಲಾ ಜಾನಾಜೆ ಆತೆ.

ಸಾಕ ಸಾಕಣ್ಣಾ ಈ ಹೊಸರಾಸ ದೆಸ್ಸ ಉಗು ಬಿಡಿಸಬೇಕಣ್ಣಾ
॥ ಪಲ್ಲ ॥ ವೀರ ನೇಹರು ಗಾಂಧಿ। ಬಾಧಿಂಧವರ್ನ ಕ್ಯೆದಿ।
ಕಳಿಸಿ ಇಟ್ಟ ಮಾಡುವದು ವ್ಯಾಸಾ ॥ ೧ ॥ ಪದುಸಾ ಅರವತ್ತ
ಕೋಟಿ। ರೂಪಾಯಿ ಮಾಡಿ ಲೂಟಿ। ಹಾಕಿ ಬಿಟ್ರು ಸೈಮಗ
ಬಂಗೋಟಿ ॥ ೨ ॥ ದಿನ್ನಾ ಜಾತ್ರಾ ತಿಂದಿ। ತೆಗೆದ ಸೂಲಿನ
ಅಂದಿ। ಧರಿಸಿ ಕಾಯ್ದು ಭಾರತ ಬಿಡತಾನಾ। ಸಾಕ ಸಾಕಣ್ಣಾ,
ಈ ಪರದೇಶ ಆಂಪಿಗ ಉಗು ದೊರೆ ಹಚ್ಚ್ಯಾನ್ನಾ ॥ ೩ ॥ ಇಪ್ಪತ್ತೈದ
ಕೋಟಿ। ತಿಂದಿ ಕೆಸಿ ಬಾಟ್ಲ। ಕುಡಿದ ಕುಡದ ಬಂತ ಬೆಕ್ಕ
ಸೊಟ್ಟ ॥ ೪ ॥ ಉದ್ಯೋಗ ಧಂದೆಗ ಮುರಿದ। ಬಿದ್ದ ಕ್ಯೆದಿ
ಗಾಂಧಿ। ಇನ್ನರೆ ಬಿಡು ಕೆಟ್ಟ ತಿಂದಿ-॥ ಸಾಕ ಸಾಕಂಣಾ, ಈ ಕರೆ
ತಿಂದಿ ಮಸ್ತ್ಯಾಗ ಬಿಸ್ಕ್ಟಿ ಹೊಡ್ಯ್ಯಾಣ್ಣಾ ॥ ೫ ॥ ಬೆಳಿಸಿ ಫಾಳಿ ಪಟ್ಟ।
ರೈತರ ಉಗದ ಘಟ್ಟ। ತಿನ್ನಾಕ ಸಿಗದಾಂಗ ಅವರಿಗೆ ರಾಗಿ
ರೊಟ್ಟಿ ॥ ಅಲ್ಲ ಅಲ್ಲಣ್ಣಾ ಈ ಇಂಗ್ರೇಜ ಸರಕಾರ ರೀತಿ ಒಳ್ಳೆ
ಪಲ್ಲಣ್ಣಾ ॥ ೬ ॥ ತಂದ ದೊಡ್ಡ ದೊಡ್ಡ ಗಿರಣಿ। ಮುಚ್ಚಿದು
ಮಗ್ಗದ ಕುಣಿ। ನೇಯುಕಾರ ಬಡಕೋತಾರ ಹಣಿ ಹಣಿ ॥
ಹಾದ ಹಾದಣ್ಣಾ ಇದನೆಲ್ಲಾ ನೋಡಿ ಬಂತ ಗಾಂಧಿಗೆ ಕರುಣಾ
॥ ೭ ॥ ಎಂಜೆ ಇಮನತನಕಾ। ದೇಶ ಉದ್ಧೃತಿ ತನಕಾ। ಪೂರ್ವ

आमचेकडे रहाट, टकळ्या, स्प्रिंगच्या टकळ्या, सर्व तऱ्हेचे कापसाचे पेळू, शुद्ध खादी व पटके, देशी कांच सामान, देशी साबण, सर्व तऱ्हेच्या कानडी व मराठी पद्यावल्या, हरतऱ्हेचे देशभक्तांचे व देवादिकांचे फोटो व लॉकेट्स वगैरे सर्व तऱ्हेच्या पूर्ण देशी माल ठोक व किरकोळ भावाने विकत मिळेल. तसेच फोटोस फ्रेमी घालून देऊं.

गोपाळ भगवंत केशकामत

जनरल मर्चंट

शहापूर—बेळगांव.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪದಗಳು.

ಧಾಟಿ:- ಮುರಾಮುಂಬೈ ಲಾ ಜಾವಾಜ ಆತಿ.

ಸಾಕ ಸಾಕಣ್ಣಾ ಈ ಹೊರಗಿನ ದೇಸ್ಸ ಲಗಾ ಬಿಡಿಸಬೇಕಣ್ಣಾ || ಪಲ್ಲ || ವೀರ ನೇತರು ಗಾಂಧಿ । ಇಂಥಿಂಥವರ್ನ ಕೈದಿ । ಕಳಿಸಿ ಇಟ್ಟ ನೋಡುವದೆಸ್ಟ್ರ ಪ್ರಾಣಾ || ೧ || ಮದುವಾ ಅವತ್ತ ಕೋಟಿ ರೂಪಾಯಿ ನಡಿ ಲೂಟಿ । ಹಾಕಿ ಬಿಟ್ರ ನಮಗ ಲಂಗೋಟಿ || ೨ || ದಿನ್ನಾ ಜ್ಯಾತ್ರಾ ತಿಂವಿ । ತೆಗೆದ ನೂಲಿನ ಅಂವಿ । ಧರಿಸಿ ಕಾಪ್ಪು ಭಾರತ ಬಡತಾನಾ । ಸಾಕ ಸಾಕಣ್ಣಾ, ಈ ಪರದೇಶ ಅರಿವಿಗೆ ಲಗ್ನ ಬಿಡಿ ಹಚ್ಚಣ್ಣಾ || ೩ || ಇಪ್ಪತ್ತೈದ ಕೋಟಿ । ತಿಂದಿ ಕೆಗ ಬಾಟ್ಲಿ । ಕುಡದ ಕುಡದ ಬಂತ ಬೆಕ್ಕ ನಾಟ್ಟಿ || ೪ || ಉದ್ಯೋಗ ಧಂದೆಗ ಮುಂದ । ಬಿದ್ದ ಕೈದಿ ಗಾಂಧಿ । ಇನ್ನರೆ ಬಿಡಾ ಕೆಟ್ಟ ತಿಂದಿ || ಸಾಕ ಸಾಕಣ್ಣಾ, ಈ ಕೆರೆ ತಿಂದಿ ಮದ್ಯಗಳಿಸ್ಸಿ ಹೊಡ್ಯಣ್ಣಾ || ೫ || ಬೆಳಿಸಿ ಫಾಳ್ತ ಏಟ್ಟ । ಕೈತಪ್ಪ ಬಗದ ಘಟ್ಟ । ತಿನ್ನಾಕ ಸಿಗದಾಂಗ ಅವರಿಗೆ ದಾಗಿ ಕೊಟ್ಟ || ಅಲ್ಲ ಅಲ್ಲಣ್ಣಾ ಈ ಇಂಗ್ರೇಜ ಸರಕಾರ ರೀತಿ ಒಳ್ಳೆ ಮಲ್ಲಣ್ಣಾ || ೬ || ತಂದ ದೊಡ್ಡ ದೊಡ್ಡ ಗಿರಣಿ । ಮುಂಬೈದು ಮಗ್ಗದ ಕಣಿ । ನೇಯುಕಾರ ಬಡಕೊಂತಾರ ಹಣಿ ಹಣಿ || ಹಾದ ಹಾದಣ್ಣಾ ಇದನೆಲ್ಲಾ ನೋಡಿ ಬಂತ ಗಾಂಧಿಗೆ ಕರುಣಾ || ೭ || ಎಂಟ್ನೆ ಇಮನತಕರಾ । ದೇಶ ಉನ್ನತಿ ಕಿರಾ । ಪೂರ್ವ

ಪುಣ್ಯಾ ಇರುವತನಕಾ ಬೇಕಾ ॥ ಹಾದ ಸ್ವಾದಣ್ಣಾ ಈ ಇಂಗ್ರಜ ಸರಕಾರ ಪುಣ್ಯಾ ಇಂದಿಗೆ ಮುಗಿತಣ್ಣಾ ॥ ೮ ॥ ಸ್ವರಾಜ ಸಾಸನಾ-ಮಣಾ । ಬಸ್ರಿ ಬಹಳ ಜನಾ । ರಾಷ್ಟ್ರ ಸಂಘಾಪದ ಮುಕ್ತಿದಾರ ಮಣ್ಣಾ ॥ ಸಾಕ ಸಾಕಂತಾ ಈ ಇಂಗ್ರಜ ಸರಕಾರದ ಇಂಥಾ ಪರ ಮುಂದ ಮಾಡೇನಾ ॥ ೯ ॥ ಶಾಂತಿ ಕಿತ್ತಾ ಸಾರಿ । ಆಗಿ ಎತ್ತ್ರಾ ಏರಿ । ಗಾಂಧಿ ತತ್ವಕಿರಬೇಕ ಬಹಳ ಜ್ವಾರಿ ॥ ಕೇಳ ಕೇಳ್ರಿ ಕಣ್ಣಾ ಇಷ್ಟಮಾತ್ರಾಲೆ ಎಲ್ಲಾ ತಿಳಕೊಂಡ ಇನ್ನ ನಡಿದಣ್ಣಾ ॥ ೧೦ ॥

ಚರಿಯಾ ರಥಕ ಮಾಸ್ತರಾಗ
ಬೆಳಗಾಂವ.

ಧಾಟಿ:— ರಾಧಕೃಷ್ಣ ಬೋಲಿ ಮುಖಸೆ

ಸುಪ್ರಭಾತ ಶೋಗಾನ । ಉಂಮತಿಕ ತುತ್ತೂರಿ ಕೇಳಿ ಮಳಿಗೆಳಿರಿ । ಬಾಂಧವರೇ ॥ ಪಲ್ಲ ॥ ಭೇದಬಾಂಧವರೊಡಗೂಡಿ । ಪ್ರೀತಿ ಬಿಡಿ ಮನಸು ಲಗು ಮಾಡಿ । ದಾಸ್ಯಮುಕ್ತ ಭೂ ಜನನಿ । ಪಾಪ ಬಿಡಿಸುವಾ ಬನ್ನಿ ॥ ೧ ॥ ಕ್ಲೇಶಕೆಳ್ಳಗಾದ ಮೋಹನ । ದಾಸ ಗಾಂಧಿ ಮಹಾತ್ಮನ ಜಯ । ಘೋಷ ಹೊಡಿಯ ಕೋಸುಗ ಜನದಿ । ಹಾಸಿಗೆಯನು ತೊರೆಯುತ ಮುದದಿ ॥ ೨ ॥

ಚರಿಯಾ ರಥಕ ಮಾಸ್ತರಾಗ
ಬೆಳಗಾಂವ.

ಧಾಟಿ:— ಯಂಭಾತ ಗುರುನಾಥನ

ಯಂಭಾತ ಮಹಾತ್ಮನ, ಬಹಳ, ಅಂತಃಕರುಣಾಳ್ವಾತನ ॥ ಪ ॥
ಶಾಂತಿ ಯುದ್ಧವ ಹೂಡಿ, ಸ್ವಂತ ಸುಖವ ದೂಡಿ, ಯುಕ್ತ

ಮಾಸ್ತೇಶನ, ಅಮ್ಮನಮ್ಮ ಜಾಣೆ ॥ ಅ. ಪ. ॥ ಜಂತ್ರದ
ತಿರವಂದಾನ, ನಮ್ಮೆಲ್ಲರಿಗು, ಪರತಂತ್ರತೆ ಸಾಕೆಂದಾನ, ಜಂತ್ರಾ
ತಿವಿ ಆಂಗ್ಲರ ಯಂತ್ರಗಳ ಮುರಿದು, ಸ್ವತಂತ್ರತೆ ಪಡಿಯೆಂದಾನ ೧-
ಖಾದಿಯ ಘೋಷಿಸೆಂದಾನ, ವಿದೇಶಿ ವಸ್ತು, ನಾಶ ಬಯಸೆಂದಾನ,
ಹೋದ ರಾಜ್ಯವ ಸಂಪಾದಿಸು ತತ್ವದ, ಬೋಧವ ತಿಳಿಯೆಂದಾನ॥ ೨
ದ್ವಂದವ ಮುರಿಯೆಂದಾನ, ಶಾಂತಿ ಸತಿ, ಛಂದವ ತ್ಯಜಿಸೆಂದಾನ,
ಒಂದು ಮನಸ್ಸಿನ ರೀತಿಯಿಂದಾಗಿ ಭರತ ಭೂ, ಬಂಧನ ಬಿಡಿಸೆಂ
ದಾನ ॥ ೩ ॥

ಜನಪದ ವರ್ಧಕ ಪಂ. ಸಬಾಗ
ಬೆಳಗಾಂವ

ಮಾತೃ ಸ್ತೋತ್ರ

ಮಾತೃಭೂಮಿ ಜನನಿ ನಿನ್ನ ಚರಣಸೇವೆ ಮಾಡುವಾ,
ಪರಮ ಹರುಷದಿಂದ ನಿನ್ನ ಹಿತಕೆ ಪ್ರಾಣನೀಯುವಾ ॥ ಪಲ್ಲ ॥
ತನು-ಮನ-ಧನ ದಿಂದ ನಿನ್ನ ಘನತೆಯನ್ನು ಬೆಳೆಸುವಾ,
ದಣಿಯದೆ ಅನುದಿನವು ದಿವ್ಯ ಗುಣಗಣಂಗಳ ಕೊಳ್ಳುವಾ ॥೧॥
ಒಂದೆ ಮಾತೃ ಬಂಧು ಭಾವ ದಿಂದ ನಿನ್ನ ಮಕ್ಕಳು,
ಒಂದುಗೂಡಿ ಪಾರತಂತ್ರ್ಯ ಬಂಧನ ಹರಿದೊಗೆವೆವು ॥ ೨ ॥
ಕೆಟ್ಟ ಕಣ್ಣಿನಿಂದ ನೋಳ್ಪ ದುಷ್ಟ ಜನರಿಗಂಜದೆ,
ದಿಟ್ಟತನದೊಳೆಲ್ಲ ರಟ್ಟೆ ಗೂಡುತಿಹೆವು ಕಷ್ಟಕೆ ॥ ೩ ॥

ನಮ್ಮ ದಯಾಳು ಸರಕಾರ

ತಾಯ್ನಂದಿಗಳೇ ಹೇಗಿದೆ ನೋಡಿರಿ ನಮ್ಮ ಸರಕಾರ,
ನಾಯಿಗಿಂತಕಡೆ ನಾವಾಗಿರುವದು ಏನು ಚಮತ್ಕಾರ ॥ ಪ ॥
ಆಸುರಿ ಏನು ಚಮತ್ಕಾರ, ಇದರೊಳಗಿನ ಏನು ಚಮತ್ಕಾರ
ದನಗಳ ಮೇಸಿಗೆ ಹುಲ್ಲಿನಕಾವಲ ಕಾಯಿದ. ಸರಕಾರ,

ದಿನಾಲು ಹೊಲ್ಲ್ನ ವ ತಕ್ಕೆಬಿಂಡಿದನು ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಜನತ ಅಗತ್ಯದ ಹುಣ್ಣಿನ ವಸ್ತ್ರಗಳ ಕಾಯುವ ಸರಕಾರ
ನಿರುತದೆ ಸಿಂಪಿಯು ಬನಸನು ಕಾಯುವುದು ದಯನಾಳು ಸರಕಾರ
ನಮ್ಮೀ ಧರ್ಮದ ಸರಕಾರಾ ॥ ೧ ॥
ಊರು ಕೇರಿಗಳ ಆರೋಗ್ಯವನೀ ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ನೀರಿಲ್ಲದಲೀ ಜೀವಿಸುಹೋರ ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಅರಗೊಳ್ಳುಂಬುವ ಒಕ್ಕಲಿಗರನೂ ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ನಿರುತದೆ ಸಿಂಪಿಯುಬನಸನನು ಕಾಯ್ವುದು ಉದಾರಸರಕಾರ,
ನಮ್ಮೀ ಪ್ರೇಮಳಸರಕಾರಾ ॥ ೨ ॥
ಪೊಟ್ಟೆಯ ತುಂಬುವ ವಿದ್ಯದಸಾಲೆಯ ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಗಟ್ಟಿಗರಾಗುವ ದಂಡಿನ ಸಾಲೆಯ ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಹುಟ್ಟಿದನಾಡಿನ ಸೇವೆ ಮಾಡುವರ ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಬಿಟ್ಟುಬಿಡದಲೆ ಸಿಂಧಿಯು ಬನಸನು ಕಾಯುವ ಸರಕಾರ;
ನಮ್ಮೀ ಬಲಿಷ್ಠ ಸರಕಾರಾ ॥ ೩ ॥
ಜಗಕ್ಕೆ ಶಾಂತಿಸುಖಕೊಡುವ ದಾಟಿಯ ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಬಗೆಬಗೆಯಮ್ಮಯ ಕೈಗಾರಿಕೆಗಳ ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಮಿಗಿಲಾದೆಮ್ಮಯ ವ್ಯಾಪಾರವನೂ ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಹಗಲಿರುಳೂ ಸಿಂಧಿಯು ಬನಸನು ಕಾಯ್ವುದು ಸರಕಾರ,
ನಮ್ಮೀ ವಿಚಾರಿ ಸರಕಾರಾ ॥ ೪
ಪರಮಹಾತ್ಮ ಪಂಡಿತರನ್ನು ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಸಕಲ ಜೀವಿ ಕಮಲಾದಿದೇವಿಯರ ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಪರಕೀಯರ ಸಂಕಟದಿಂದೆಮ್ಮನು ಕಾಯುವ ಸರಕಾರ,
ಹರುಷದೆ ಸಿಂಧಿಯು ಬನಸನು ಕಾಯ್ವುದು ಪುಣ್ಯದ ಸರಕಾರ,
ನಮ್ಮೀ ಉತ್ತಮ ಸರಕಾರ ॥ ೫ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ರಾಗ ಮೋಹನ, ಆದಿತಾಳ

ರಕ್ಷಿಸು ಕರ್ನಾಟಕ ದೇವಿಯೆ ಸಂ-
ರಕ್ಷಿಸು ಕರ್ನಾಟಕ ದೇವಿ || ಪಲ್ಲ ||
ಕದಂಬಾದಿನೃಪಪೂಜಿತ ಚರಣೆ ।
ಗಂಗಾರಾಧಿತ ಪದನಖ ಸರಣೆ ।
ಚಲುಕ್ಯರುತ್ತಮ ಕಾಂಚೀ ಕಿರಣೆ ।
ರಾಷ್ಟ್ರಕೂಟ ಮಣಿ ಕೌಸ್ತುಭಭರಣೆ ।
ಹೊಯ್ಸಳರುಕ್ತಾಂಶುಕ ಶೋಭನವರ್ಣೆ || ೧ ||
ಯಾದವಮಣಿ ಕಂಕಣಾಂಶು ಸುಂದರಿ
ಬಲ್ಲಾಳರ ಭುಜ ಭೂಷಣ ಬಂಧುರೆ ।
ವಿಜಯನಗರ ಮಂಗಳಮಣಿ ಕಂಧರೆ ।
ಮಾಂಡಲಿಕಾವನ ಭಾರಧುರಂಧರೆ || ೨ ||
ಮತಸ್ಥಾಪಕ ಸ್ಥಾಪಿತ ಪ್ರಾಣೆ ।
ಶಿಲ್ಪಕಲಾ ಮಂಟಪ ಸುಸ್ಥಾನೆ ।
ಕವಿಜನ ಕೀರ್ತಿತ ಸುಮಧುರಸ ತ್ರಾಣೆ ।
ಸಾಧು ಸತ್ಯಧಾ ಭೇರಿದಪ್ಪನೆ ।
ಸ್ಫೂರ್ತಿಶಾಸನಿಗಾಯನ ವಾಣೆ || ೩ ||

ಸಮೃದ್ಧಿ ಭರತಭೂಮಿ

ಸಮೃದ್ಧಿ ಸಮೃದ್ಧಿ ಭರತಭೂಮಿ || ಪಲ್ಲ ||
ಹೆರವರಂ ನಂಬದಲೆ ಜಗದೀಶ್ವರಂ ತಾನೆ ।
ಧರಿಸಿ ನಾನಾವತಾರಂಗಳನ್ನು ।
ಕರೆವ ಸರ್ವಸ್ವಮುಂ ಧರೆಯ ಸಂರಕ್ಷಿಸುವ ।
ತೆರವ ಕಲಿಸಿದ ಪೂರ್ವ ವಶಾಲೆ || ೧ ||

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ಉಚ್ಚತತತ್ತ್ವಾರ್ಥಗಳನಾಚರಿಸಿ ಲೋಕವ
ನ್ನೆಚ್ಚರಿಸಿ ದೇವರಿಚ್ಛಾಜ್ಯೋತಿಯಿಂ ||
ಅಚ್ಚಳಿಯದೊಳುಗ್ಗಿದ ಸುರುಷ ಕವಿಷಿಂಧರರು |
ಸ್ವೇಚ್ಛೆಯಿಂ ನೆಲೆಗೈದ ಸುಕ್ಷೇತ್ರಪ್ರ || ೬ ||
ಪದವೀಧರರ್ಪೇಳ್ದ ಪದ್ಧತಿಗಳಿಂ ಬಿಡದೆ |
ಸದಭಿಮಾನೈಕ್ಯತಾಪೋರ್ತಾಹದಿಂ |
ಉದಿತಸುಸ್ಫೂರ್ತಿಯಿಂದೆನ್ನ ಪೂರ್ವಜರಿದ್ದ |
ಮುಂದಿನ ಭಾಗ್ಯದ ನಿಧಿಯು ಮುಂದಿರವಿದು || ೭ ||
ದೇವರುಷಿ ಪೂರ್ವಜರುದಾತ್ತಪ್ರವೃತ್ತಿಪ್ರಭಾ |
ಭಾವನಾಮೃತ ವೃಷ್ಟಿಯಿಂ ಬೆಳೆಯುವಾ ||
ಭಾವಿಸುಖಸಾಮ್ರಾಜ್ಯವೆಂಬ ಸತ್ಫಲಗಳಿಂ |
ನೀವ ಸರ್ವೋತ್ಕೃಷ್ಟ ನಂದನವನಂ ||

ಕರ್ನಾಟಕಾಂಬೆ ನೀ ಧನ್ಯೆ ಧನ್ಯೆ

ಕರ್ನಾಟಕಾಂಬೆ ನೀ ಧನ್ಯೆ ಧನ್ಯೆ |
ಬಣ್ಣಿಸುವ ನಿನ್ನ ನಾಮೆಂತು ಜಗಮಾನ್ಯೆ || ಪಲ್ಲ ||
ರಾಮಾನುಜಾಚಾರ್ಯರಾ ಶಂಕರಾಚಾರ್ಯರ |
ಶ್ರೀಮದಾನಂದತೀರ್ಥಾಚಾರ್ಯರೂ ||
ಆ ಮಹಾ ಬಸವೇಶ್ವರಾದಿ ಸದ್ಗುರುವರರು |
ಹೇ ಮಾತೆ ನಿನ್ನುದರದಲ್ಲಿ ಜನಿಸಿಹರಾ || ೧ ||
ಯಾದವ ಕದಂಬ ಚಾಲುಕ್ಯ ವರರಾಷ್ಟ್ರಕೂ |
ಟಾದಿ ಘನನೃಪರು ನಿನ್ನನು ಸೇವಿಸಿ ||
ಈ ಧರಿತ್ರಿಯೊಳು ನಿನ್ನಯ ಕೀರ್ತಿಕೇತುವನು |
ಮೋದದಿಂ ಮೆರಸಿಹರು ಭುವನ ವಂದಿತಳೆ || ೨ ||

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ಧೀರವಿದ್ಯಾರಣ್ಯ ಗುರುಗಳಿಂದಲಿ ನಿಂನ ।
ವೀರ ಪುತ್ರರಿಗೆ ಪ್ರತಾಪ ಬೆಳಿಸಿ ॥
ಚಾರುತರ ವಿಜಯನಗರದ ರಾಜ್ಯದೊಡನೆ ನೀ ।
ಸ್ವರಾಜ್ಯ ಸಿಂಹಾಸನದಿ ವಿರಾಜಿಸಿದೇ ॥ ೩ ॥
ರನ್ನ ಲಕ್ಷ್ಮೀಶ ಹರಿಹರ ಷಡಕ್ಷರದೇವ ।
ಪೊನ್ನ ನಯಸೇನ ನೃಪತುಂಗ ಪಂಪ ॥
ಜನ್ನ ಗದುಗಾದಿ ಕವಿವರ್ಯರಿಂ ನುತಿಗೊಂಡ ।
ಸನ್ನುತಳೇ ನಿನ್ನ ಮಹಿಮೆಯನೆಂತು ಬಣ್ಣಿಸಲಿ ೪
ಬಲು ರಮ್ಯವಿಹ ದೇವಾಲಯಗಳಿಂದ ಮೇಣ್,
ಚೆಲುವ ಪ್ರಾಚೀನ ಕಟ್ಟಡಗಳಿಂದೆ,
ಹಲವು ಮಹಾನದಿಗಳಿಂ ಬೆಳೆಗೂಳ್ವ ಭೂಮಿಯಿಂ,
ಸಲೆ ಮೆರೆಯುತಿರುವೆ ನೀನೀ ಭುವನದೊಳಗೆ ೫
ಪರದೇಶ ಸಂಭಾಷೆಗಳಿಗೆ ಮರುಳಾಗಿ ನಾವ್,
ಮರೆತು ಬಿಟ್ಟೆವು ನಿನ್ನ ಮಧುರ ನುಡಿಯ,
ಮರೆದು ನೀನೀ ಪಾಮರರು ಗೈದ ದೋಷವನು,
ಪೊರೆಯಮ್ಮ ಶ್ರೀಕೃಷ್ಣ ಪ್ರಿಯಕೃಷ್ಣ ವರ್ಣೇ ೬

ಬಸವೇಶ್ವರನಲ್ಲಿ ಪ್ರಾರ್ಥನೆ.

[ಲೇಖಕ:-ಆನಂದಕವಿ ಕುರಗುಂದ]

ಧಾಟಿ:- ಆನಂದಾಚಾ ಕಂದಹರಿಹಾ ಎಂಬಂತೆ

ಬಸವಾ ಬಾ ! ಬಾ ವಸುಧೆಗೆ ನಿನ್ನಯ,
ಜಸವನು ಬೇಗನೆ ತೋರಲು ಬಾ,
ರಸಿಕರ ಮನಸಿಗೆ ಕುಶಲವ ಬೀರುತ,
ಹೊಸರಾಜ್ಯವ ನೀನಾಳಲು ಬಾ ೧.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ಮಂತ್ರಿಯು ಕೆಲಸವ ತಂತ್ರದಿ ನಡೆಸುತ್ತೆ,
ಜಂತ್ರವ ನೀ ತಿರುಗಿಸಲು ಬಾ
ತಂತುವ ತೆಗೆಯುತ ಸ್ವಂತದಿ ನೇದಿಹ,
ಮಂತ್ರದ ಬಟ್ಟೆಯ ಧರಿಸಲು ಬಾ
ಕನ್ನಡ ನುಡಿಯದು, ಸಂಪಾಗುತ್ತಿದೆ,
ಚೆನ್ನಿಗ ಬಸವನ ಕೊಡೆಯಲು ಬಾ,
ಉನ್ನತ ಜನರಿಗೆ, ಕನ್ನಡ ಮಂತ್ರವ,
ನಿನ್ನಯ ವಚನದಿ ಹೇಳಲು ಬಾ,

ಧ್ವಜವಂದನೆ.

ಅಖಿಲ ಭಾರತೀಯ ಜಯ, ಧ್ವಜಕೆ ವಿಜಯವಾಗಲಿ,
ಸಕಲ ಲೋಕಪಾಲರು, ಧ್ವಜಕೆ ಶುಭವ ನೀಯಲಿ,
ಸಿಂಧು ಭದ್ರ ಯಮುನೆ ಗಂಗೆ, ನರ್ಮದಾಸೆ ಯದ್ವಜಂ,
ಹಿಂದ್ಯಸೇತು ಹಿಮಗಿರೀಂದ್ರ, ಸ್ವಾಂದ್ರಕೇಂದ್ರ ಭೂ ಧ್ವಜಂ

ಸಂಪೂರ್ಣ

BRITISH MUSEUM 12 32 ULT

NATIONAL ARCHIVES OF INDIA